# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

☎ : 24010437/ 24020781/ 24014701
फॅक्स : 24024068
visit us at : http//mpcb.gov.in
email : enquiry@mpcb.gov.in

कल्पतरु पॉईंट, 2/ 3/ 4 था माळा,
सिनेट प्लॅनेट समोर, सायन सर्कल,
सायन (पूर्व), मुंबई - 400 022.

क्रमांक : मप्रनि/सह-सं.(हप्रनि.)/ ३१०९ दिनांक : ०९ /०७/२०१५.

प्रति,
**प्रादेशिक अधिकारी**,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कल्याण.

**विषय:- दिनांक ०३/०७/२०१५ रोजी मा.सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या डोंबिवली अतिप्रदूषित क्षेत्रातील प्रदूषण निर्देशांक कमी करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या कृती आराखडा अंमलबजावणीसाठी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताबाबत..**

उपरोक्त विषयाबाबतचे इतिवृत्त मा.सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी मान्य केले आहे. तरी याबाबत आपल्या कार्यालयाशी संबंधीत विभागांना/कारखान्यांना पत्राद्वारे कळविण्यात यावे व त्यासंबंधीचा कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा (सोबत इतिवृत्ताची छायांकित प्रत जोडली आहे).

सोबत:- वरीलप्रमाणे.

(**वि. मो. मोटघरे**)
सह-संचालक (हप्रनि)

प्रत माहितीकरीता सादर:-
मा.सदस्य सचिव यांचे स्वीय सहायक, म.प्र.नि.मंडळ, मुंबई

सोबत:- वरीलप्रमाणे.

मा.सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ याच्या अध्यक्षतेखाली डोंबविली,औद्योगिक परिसरातील सर्वांकष पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक (CEPI) ॲक्शन प्लान बाबतची दि.०३/०७/२०१५ रोजी म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, मुंबई येथे झालेल्या पर्यावरण कृती आराखडा आढावा बैठकीचे इतिवृत.

------

मा.सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली दि.०३/०७/२०१५ रोजी म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, मुंबई येथे डोंबिवली औद्योगिक क्षेत्र, पर्यावरण कृती आराखडा अंमलबजावणीसंबंधी आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत उपस्थित असलेले अधिकारी व उद्योगाचे प्रतिनिधी, तसेच संबंधित शासकीय प्रतिनिधी यांची यादी सोबत जोडली आहे.

सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी प्रस्ताविकात सांगितले की, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पर्यावरण विषयक कृती आराखडयाच्या गुणवत्तेच्या आधारे महाराष्ट्रातील पाच शहरे - तारापूर, चंद्रपूर, नवी मुंबई, औरंगाबाद, डोंबीवली, कल्याण ही अति प्रदुषित असल्याचे नोव्हेंबर, २००९ मध्ये घोषित करण्यात आले. डोंबिवली शहराचा पर्यावरण विषयक प्रदूषण निर्देशांक ठरविताना जल, हवा व जमीन प्रदूषणावर भर देण्यात आल्याचे सांगून पर्यावरण विषयक कृती आराखडा संदर्भात सविस्तर माहिती सांगितली. कृती आराखडयाची गुणवत्ता काढतांना हवा, पाणी, पाणी, जमीन हे मुद्दे केंद्र स्थानी असल्याबाबत नमुद केले. फेब्रुवारी-२०११ मध्ये केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने चंद्रपूर शहर व्यतिरिक्त इतर प्रदुषित शहरांवर उद्योगांच्या बंदीची अट काढून टाकल्याचे सांगितले. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मडळाने सन २०११-२०१३ साली पुन्हा प्रदुषित सर्वांकष पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक (CEPI) प्रसारित केलेला होता.

सह संचालक (हप्रनि), म.प्र.न.मंडळ यांनी डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील क्लस्टरच्या क्लस्टरच्या पर्यावरण विषयक कृती आराखडयासंदर्भात सर्वकष सादरीकरण व सद्य:स्थितीबाबतचा अहवाल मांडण्यात आला.

सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी सादरीकरण दरम्यान उपस्थित केलेले मुद्दे खालीलप्रमाणे:-

- औद्योगिक परिसरातील उद्योगांनी प्रदुषणाचे प्रमाण कमी करण्यासंदर्भात करावयाच्या उपाययोजनांमध्ये उपलब्ध नविन तंत्रज्ञानाचा वापर करुन हवा, पाणी व घातक घनकचरा यापासून होणारे प्रदूषणाचे प्रमाण कमी करणे.
- औद्योगिक परिसरात महानगरपालिका करीत असलेल्या रस्त्याच्या दुरुस्ती व सुधारणांच्या कामास लागणारा कालबध्द कार्यक्रम महानगरपालिकेने म.प्र.नि.मंडळास कळवावा. ज्या ठिकाणी मंडळामार्फत हवेची गुणवत्ता मोजण्याचे स्थानके कार्यान्वित आहेत, त्या परिसरातील रस्त्यांची कामे महानगरपालिकेने प्राधान्याने पूर्ण करावीत.
- औद्योगिक परिसरामध्ये बांधकाम चालु आहे, अशा ठिकाणी धुळीकणाचे प्रमाण कमी करण्यासाठी सभोवताली बॅरिअर्स, पत्रे लावावीत व तसेच मोठया प्रमाणात वृक्षारोपण करावे (ग्रीन बेल्ट विकसित करावा) अन्य उपाययोजनांचा वापर करावा.
- म.प्र.नि.मंडळाने सातत्याने कारखान्यांचे सर्वेक्षण करुन प्रत्येक महिन्यास अहवाल सादर करावा. तसेच सुरुवातीस सर्व मोठया उद्योगांनी पर्यावरणीय तपासणी (ऑडिट) करुन घ्यावे. (मान्यता प्राप्त संस्थेकडून)
- म.औ.वि.मंडळातर्फे कार्यकारी अभियंता, उप-कार्यकारी अभियंता व म.प्र.नि.मंडळातर्फे प्रादेशिक अधिकारी,उप-प्रादेशिक अधिकारी, कल्याण यांनी एकत्रित सर्वेक्षण करुन, संमतीपत्र न घेतलेल्या उद्योगांचा अहवाल सादर करावा. बरेचसे उद्योग भूखंडधारक म.औ.वि.मं. पोटभाडयाने (सबलेट) व अशा उद्योगांना संमतीपत्राविना पाणी पुरवठा करु नये व त्याबाबतची सूची म.प्र.नि.मंडळास १५ दिवसांत सादर करण्यात यावी.

- म.प्र.नि.मंडळाने राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेस लेखी पत्राद्वारे म.औ.वि.महामंडळाने म.औ.वि.महामंडळाने दिलेल्या प्रस्तावाबाबत पाठपुरावा करण्यासाठी कागदपत्रे म.औ.वि.महामंडळाने ७ दिवसांच्या आत देण्यात यावेत.

- औद्योगिक परिसरात ४ मोठे (मे.घरडा केमिक्लस, मे. मेट्रोपोलीटन एक्सिंमकेम, मे. मे. मोनोर्च कॅटलिस्ट व मे. ऑक्टेल केमिक्ल्स) उद्योग असून, त्यांनी आयसिटी, माटुंगा, या संस्थेकडून अस्थिर सेंद्रिय घटक (VOCs) यांचा तपास (ऑडिट) करुन दोन महिन्यांच्या आत मंडळास अहवाल सादर करावा व त्यासाठी सदर उद्योगांनी ५ लाख रुपयांची बँकहमी म.प्र.नि.मंडळास सादर करावी.

- १०० घन मि./दिन या उद्योगांनी सांडपाणी प्रक्रिया करण्याकरीता तांत्रिक तपासणी (ऑडिट) करुन घ्यावे व त्याबाबतचा अहवाल मंडळास एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.

- १५ ऑगस्ट २०१५ पर्यंत निरंतर वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी यंत्रणा (CAAQMS) उभारणीचे काम करावे.

- औद्योगिक संघटना, सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा व म.औ.वि.महामंडळ यांनी मोठया प्रमाणावर झाडे लावण्याचा कार्यक्रम राबवावा.

संजय सरकार, महानगर गॅस यांनी असे सांगितले की, डोंबिवली औद्योगिक औद्योगिक परिसरातील फेज-१ येथे डिसेंबर-२०१५ पर्यंत गॅस पुरवठा कार्यान्वित करण्यात येईल. तसेच नोव्हेंबर-२०१६ पर्यंत उर्वरित ठिकाणी गॅस पुरवठा कार्यान्वित करण्यात येईल. औद्योगिक घटकांनी महानगर गॅसद्वारे पुरवठा करण्यात येणा-या गॅसबाबत औद्योगिक संघटनेने आक्षेप नोंदविला की, महानगर गॅस हा गॅस पुरवठा योग्य त्या दाबाबाबत (Pressure) व त्याकरीता आकारण्यात

येणा-या दराबाबत प्रादेशिक अधिकारी कल्याण, कार्यकारी अभियंता, म.औ.वि.महामंडळ तसेच औद्योगिक संघटना यांनी एकत्रित येऊन, याबाबत योग्य तोडगा काढून, त्याबाबतचा अहवाल १५ दिवसांत सादर करावा.

- कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने ओला व सुका कचरा वेगळा करण्याबाबत त्वरीत कार्यवाही करावी व महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापनाकरीता कोणत्या प्रकारची शास्त्रोक्त पध्दत वापरणार आहे त्याचासुध्दा खुलासा करावा. तसेच प्लास्टिक कचरा हा घर किंवा सोसायटी येथूनच विल्हेवाटीसाठी उचलला जाऊ नये, त्याबाबत संबंधीतास सूचना देऊन जनजागृती करावी. तसेच शासकीय पध्दतीने घरगुती घनकच-याची विल्हेवाट लावण्यासाठी कोणते तंत्रज्ञान वापरण्यात येईल, याचा अहवाल १५ दिवसांच्या आत म.प्र.नि.मंडळास सादर करावा.
- नागरी घनकचरा विल्हेवाटीच्या ठिकाणी शास्त्रोक्त पध्दतीचा अवलंब करावा.
- म.औ.वि.महामंडळाने ज्या ठिकाणी नागरी घनकचरा टाकला जातो अशा ठिकाणी संरक्षण भिंत/कुंपण घालावी.

श्री. आर. व्ही. सोनजे, उप-मुख्य कार्यकारी अधिकारी (पर्यावरण), म.औ.वि.महामंडळ यांनी असे सांगितले की, बरेचसे उद्योजक हे त्यांच्या औद्योगिक सांडपाण्याबरोबर त्यांचा घनकच-याचा विसर्ग पाईपलाईनद्वारे करतात त्यामुळे लाखो रुपये म.औ.वि.महामंडळास खर्च करावे लागतात. भविष्यात असे घडले तर, सर्व उद्योजकांवर कार्यवाही करण्यात येईल.

श्री. मधुकर अर्दड, आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी असे सांगितले की, उर्वरित ४ घरगुती सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा डिसेंबर-२०१५ पर्यंत कार्यान्वित होती व ८०% सांडपाणी प्रक्रिया करण्यासाठी घेतले जाईल.

संजय सरकार, महानगर गॅस यांनी असे सांगितले की, डोंबिवली औद्योगिक औद्योगिक परिसरातील फेज-१ येथे डिसेंबर-२०१५ पर्यंत गॅस पुरवठा कार्यान्वित करण्यात येईल. तसेच नोव्हेंबर-२०१६ पर्यंत उर्वरित ठिकाणी गॅस पुरवठा कार्यान्वित करण्यात येईल. औद्योगिक घटकांनी महानगर गॅसद्वारे पुरवठा करण्यात येणा-या गॅसमधील दाब व प्रस्तावित दराबाबत अनुकुलता दाखविली नाही, त्याबाबत सदस्य सचिव यांनी असे सुचविले की, प्रादेशिक अधिकारी, कल्याण महानगर गॅस, औद्योगिक संघटना यांनी एकत्रितरित्या तोडगा काढून १५ दिवसांत अहवाल सादर करावा.

मा सदस्य सचिव यांनी असे नमूद केले की प्रत्येक औद्योगीक घटक, सामूहिक सांडपाणी प्रक्रीया यंत्रणा, औद्योगीक संघटना यांना औद्योगीक क्षेत्रातील प्रदुषणावर निर्बंध घालून शास्त्रीय पध्दतीने हवा व जल प्रदूषण नियंत्रण यंत्रणा अद्यावत करून निरंतर (२४/७ या पध्दतीने) राबवून सर्वांकष पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक (CEPI) ५० पेक्षा कमी होईल. करीता प्रत्येक ३ महिन्यास मा.प्रधान सचिव/अध्यक्ष, म.प्र.नि.मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्रत्येक महिन्याच्या दुस-या गुरुवारी मा.सदस्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात येईल.

**सर्वांकष पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक (CEPI) डोंबिवली औद्योगिक परिसराची गुणवत्ता कमी करण्यासाठी संबंधित विभागाने करावयाची कामे:-**

| अ.क्र | बैठकीत उपस्थित झालेले मुद्दे | विभागाने करावयाची कारवाई | संबंधित विभाग |
|---|---|---|---|
| १ | डोंबिवली औद्योगिक परिसरातील उद्योगांनी प्रदुषणाचे प्रमाण कमी करण्यासंदर्भात करावयाच्या उपाययोजनांमध्ये उपलब्ध नविन तंत्रज्ञानाचा वापर | प्रदूषण कमी करण्यासंदर्भात | उद्योग, औद्योगिक संघटना, प्रादेशिक |

| | | | |
|---|---|---|---|
| | करुन हवा, पाणी व घातक घनकचरा यांपासून होणारे प्रदूषणाचे प्रमाण कमी करणे. | उपाययोजना करुन त्याचा सारांश प्रत्येक महिन्यात सादर करावा | अधिकारी, कल्याण |
| २ | महानगरपालिका/ म.औ.वि.महामंडळ करीत असलेल्या रस्त्याच्या दुरुस्ती व सुधारणांच्या कामास लागणारा कालबध्द कार्यक्रम तयार करुन १५ दिवसांच्या आत अहवाल म.प्र.नि.मंडळास कळवावा. | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका/म.औ. वि.महामंडळ | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, म.औ.वि.महामंडळ |
| ३ | संमतीपत्र न घेतलेल्या उद्योगाचे सर्वेक्षण पुढील १५ दिवसांत करणेबाबत | म.औ.वि.मं., कार्यकारी अभियंता व प्रादेशिक अधिकारी, कल्याण यांनी एकत्रित सर्वेक्षण करुन, संमतीपत्र न घेतलेल्या उद्योगांचा अहवाल सादर करावा. पोटभाडे (सबलेट) तत्वावर दिलेल्या उद्योगांना संमतीपत्राविना पाणी पुरवठा न करणे. | म.औ.वि.महामंडळ, औद्योगिक संघटना, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण |
| ४ | म.प्र.नि.मंडळाने राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेस लेखी पत्राद्वारे म.ओ.वि.महामंडळाने दिलेल्या पाईप लाईन व विल्हेवाटीचे ठिकाण निश्चितीबाबत पाठपुरावा करण्यासाठी लागणारे कागदपत्रे म.औ.वि.महामंडळाने ७ दिवसांच्या आत म.प्र.नि.मंडळास देण्यात यावेत. | म.औ.वि.महामंडळ | म.औ.वि.महामंडळ म.प्र.नि.मंडळ, कल्याण |
| ५ | औद्योगिक परिसरात ४ मोठे (**मे.घरडा केमिक्लस, मे. मेट्रोपोलीटन एक्सिंमकेम, मे. मोनोर्च कॅटलिस्ट व मे. ऑक्टेल केमिक्ल्स**) उद्योग असून, त्यांनी आयसिटी,माटुंगा या संस्थेकडून **अस्थिर सेंद्रिय घटक** (VOCs) **यांचा तपास (ऑडिट)** करुन एक महिन्याच्या आत मंडळास अहवाल सादर करावा व त्यासाठी सदर उद्योगांनी ५ लाख रुपयांची बँकहमी म.प्र.नि.मंडळास सादर करावी. | डोंबिवली औद्योगिक परिसरातील संबंधीत उद्योग | संबंधीत उद्योग/ प्रादेशिक अधिकारी |
| ६ | १५ ऑगस्ट २०१५ पर्यंत **संनियंत्रित वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी यंत्रणा** उभारणीचे काम पूर्ण करावे. | म.प्र.नि.मंडळ | सह-संचालक (हप्रनि)/ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | औद्योगिक संघटना/सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा व म.औ.वि.महामंडळ यांनी मोठया प्रमाणावर झाडे लावण्याचा कार्यक्रम राबवावा व त्याचा अहवाल पुढील सभेस म.प्र.नि.मंडळास सादर करावा. | औद्योगिक संघटना/सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा व म.औ.वि.महामंडळ | औद्योगिक संघटना/सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा व म.औ.वि.महामंडळ |
| ८ | प्रादेशिक अधिकारी यांच्या सल्ल्यानुसार ज्या मोठया कापड उद्योगांनी कॉस्टीग रिकव्हरी प्लॉन्ट उभारलेले नाहीत. अशा उद्योगांनी प्राथमिक अभ्यास करुन एक महिन्याच्या आत अहवाल सादर करावा. | औद्योगिक संघटना व प्रादेशिक अधिकारी कल्याण | औद्योगिक संघटना व प्रादेशिक अधिकारी कल्याण |
| ९ | औद्योगिक परिसरात केला जाणा-या गॅस पुरवठयाबाबत महानगर गॅस व कारखाना संघटना यांनी एकत्रित चर्चा करुन, समस्या सोडवाव्यात व त्याचा अहवाल १५ दिवसांच्या आत सादर करावा. | महानगर गॅस व औद्योगिक संघटना | महानगर गॅस व औद्योगिक संघटना, प्रादेशिक अधिकारी, कल्याण, म.औ.वि.महामंडळ |
| १० | कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने ओला व सुका कचरा वेगळा करण्याबाबत त्वरीत कार्यवाही करावी व महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापनाकरीता कोणत्या प्रकारची शास्त्रोक्त पध्दत वापरणार आहे त्याचासुध्दा खुलासा करावा. तसेच प्लास्टिक कचरा हा घर किंवा सोसायटी येथूनच विल्हेवाटीसाठी उचलला जाऊ नये, त्याबाबत संबंधीतास सूचना देऊन जनजागृती करावी. | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, प्रादेशिक अधिकारी (मुख्यालय), म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय |
| ११ | नागरी घनकचरा विल्हेवाटीच्या ठिकाणी शास्त्रोक्त पध्दत अवलंबविण्यात यावी. | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका |
| १२ | म.औ.वि.महामंडळाने ज्या ठिकाणी नागरी घनकचरा टाकला जातो अशा ठिकाणी संरक्षण भिंत/कुंपण घालावी. | म.औ.वि.महामंडळ | म.औ.वि.महामंडळ |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी ऑटो रिक्षा व इतर वाहनांमुळे प्रदूषणाची पातळी वाढत असल्यामुळे किती वाहने गॅसवर परावर्तीत झाली याची यादी दयावी. | उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी | उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी |

बैठकीस उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

सह-संचालक (हप्रनि)

सदस्य सचिव

-------

# MAHARASHTRA POLLUTION CONTRL BOARD

## Review meeting on Implementation of progress of Critically Polluted areas Action Plan—C.E.P.I.- Dombivali

## Date:- 03/07/2015 at Conference Hall, HQ, MPCB, Mumbai

| Sr. No. | Name and Designation | Organization | Contact No. | Signature |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | R.V. Sonje CEHQ/ DY CE(E) | MIDC | 8108966666 | [signature] |
| | S.R. Tupe S.E. (MMR) | MIDC | 8108119174 | [signature] |
| | N A Bhaterao Mgr Env & Res | Gharda chemicals Ltd | 9869574132 | [signature] |
| | ASHOK MEHRA. PROP. | CRYSTAL INDIA | 9821019202 | [signature] |
| | Tushar Ullengal - Director | Ullengal Bros | 9820150506 | [signature] |
| | Sachin Harkhani - Director | Mahesh Textile | 9819812201 | [signature] |
| | Kaushik Desai | [illegible] | 09820030117 | [signature] |
| | Bhoye P.Z. (A.K.) | Coll. ofice Thane | 9980341230 | [signature] |
| | Shinde V.K. | Malssons. Dombivli | 3254955 | [signature] |
| | R. Verma | ArchPharma | 9594993315 | [signature] |
| | Lalit Agrawal | Sudevi chemicals | 9702469645 | [signature] |
| | Parag S | Hoofine Chem | 9967033595 | [signature] |
| | Ameya Jogalekar | Spakorgochem | 9820202650 | [signature] |
| | R.P. Patil | MIDC | 8108092090 | [signature] |
| | Kailash Kale. | Navjeevan Tex | 9820643872 | [signature] |
| | S.P. Singh | Mahabir Dyeing | 9820585284 | [signature] |

# MAHARASHTRA POLLUTION CONTRL BOARD

## Review meeting on Implementation of progress of Critically Polluted areas Action Plan—C.E.P.I.- Dombivali

## Date:- 03/07/2015 at Conference Hall, HQ, MPCB, Mumbai

---

| Sr. No. | Name and Designation | Organization | Contact No. | Signature |
|---|---|---|---|---|
| | Madhukar. Asdad. | KDMC. | 8692889944 | [signature] |
| | J. B. Sangewar | RO Kalyan MPCB | 9869440149 | [signature] |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

# MAHARASHTRA POLLUTION CONTRL BOARD

## Review meeting on Implementation of progress of Critically Polluted areas Action Plan—C.E.P.I.- Dombivali

## Date:- 03/07/2015 at Conference Hall, HQ, MPCB, Mumbai

---

| Sr. No. | Name and Designation | Organization | Contact No. | Signature |
|---|---|---|---|---|
| 1 | Vinod Dhaidhale | DBESA | 9821019113 | [signature] |
| 2 | Hemant Bandodkar Director. | Hindustan Monomers, Dombivli | 9820295999 | [signature] |
| 3 | Murali Iyer Factory Manager | Monarch Catalyst Pvt. Ltd. | 9820081783 | [signature] |
| 4 | [illegible] Director | Astec LifeScience | 9870601016 | [signature] |
| 5 | Abhay Pethe | Dombivli CETP (1.5 MLD) | 0251-2871596 | [signature] |
| 6 | D.B. KAGZI | Shrijee lifestyle | 9820027611 | [signature] |
| 7 | A.S. Maheshwari | DBESA. | 9820021020 | [signature] |
| 8. | Dilip Gawadia | Jay Ind. Chem P. Ltd | 9819449666 | [signature] |
| 9 | Manoj Jalan | DBESA | 9820094951 | [signature] |
| 10 | Anil Ganeriwal | Pioneer Ageing | 9820528012 | [signature] |
| 11 | Hardip Bunner | Bishen Dye. | 9820156950 | [signature] |
| 12 | Vijay V. Jawale | Seagull chem | 9224163939 | [signature] |
| 13 | Saurabh Kothari | MGL | 8879677635 | [signature] |
| 14. | Sujay Sarkar | MGL | 8879590013 | [signature] |
| 15 | S. Soonert | MGL | 9324941179 | [signature] |
| 16 | Sachin Ghuge | MGL | 9324063?7 | [signature] |
| 17 | Walavalkar U.K | Metropolitan Exichem Pvt Ltd | 9167239857 | [signature] |

# MAHARASHTRA POLLUTION CONTRL BOARD

## Review meeting on Implementation of progress of Critically Polluted areas Action Plan—C.E.P.I.- Dombivali

## Date:- 03/07/2015 at Conference Hall, HQ, MPCB, Mumbai

---

| Sr. No. | Name and Designation | Organization | Contact No. | Signature |
|---|---|---|---|---|
| 18 | R.S. Puranik. Executive K.D.M.C. Engineer. | K.D.M.C. | 9833413026 | [signature] |
| 19 | Gopal Bhangre Dy. Engineer | KDMC | 7718842909 | [signature] |
| 20 | TEKADE N. P. | GHARDA CHEMICALS LTD. | 9820594829 | [signature] |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

Meeting of the Defaulting CETPs in Maharashtra on dt.02.07.2015

| Sr. No. | Name and Organization (CETP) | Contact Number | Signature |
|---|---|---|---|
| 1 | | | |
| 2 | | | |
| 3 | | | |
| 4 | | | |
| 5 | | | |
| ~~8~~ | ~~[illegible]~~ | | |
| 6 | Khushal Jain (Badlapur) | 9820094566 | R.S. Jain |
| 7. | N.G. DALE Badlapur) | 9270014680 | [signature] |
| 8 | J.R. Mogle (Jaysingpur) | 9822431213 | [signature] |
| 9. | Gautam Makhoriya (Lote) | 9321026872 | [signature] |
| 10 | Kasture D.C. Kagal-Hatkalangale Five star User Ind. Coop. Sty. Ltd, Kagal | 9730303183 | [signature] |
| 11 | Mohale H.B. Dy. Ex. Smeshagm | 7588795565 | [signature] |
| 12 | G.P. Borole (Mahad) | 7350084771 | [signature] |
| 13 - | Rajendra Prasad | 9892605897 | [signature] |
| 14 | N.S. Kamalapurkar (PREACETP) | 9967586551 | [signature] |
| 15 | Abhay Pethe | 0251-2871596 | [signature] |
| 16 | Manoj Jalan | 0251-2445719 | [signature] |
| 17 | Shrikant Pawar (Greenfield CETP) | 9970121532 | Pawar |
| 18 | DBESA Dombivali DBKayani | 09820027617 | [signature] |
| 19 | G.S. Jadhav (TEPS-CETP) | 9323023612 | [signature] |
| 20. | Suresh Bhonsle (9819830246) | | [signature] |
| 21 | Ravindra Jadhav (Five Star Kagal) | | Jadhav |
| 22 | R.S. Kshirsagar MIDC Civil Dn Pune | 8108119157 | R.S. Kshirsagar |
| 23 | P.S. Thenge MIDC Ranjangaon | 8149012003 | [signature] |
| 24 | Y.C. Sutar MIDC Ranjangaon | 9422325150 | [signature] |
| 25 | N.S. Adhav Kurkumbh | 9822756828 | [signature] |